जा.क्र.मुंपम/ग्रंथालय/ 1435/२०२६

मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई – १२

दिनांक : 21/07/२०२६

## जाहिर प्रगटन

मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई - १२ या ठिकाणी एम.व्ही.एस.सी या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविला जातो. सन २०२६-२७ आणि २०२७-२८ पासून पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचा एक अनिवार्य भाग म्हणून Library and Information Services (PGS-501) (0+1) हा कोर्स द्वितीय वर्षासाठी शिकविण्यात येत आहे.

सदर कोर्स हा नॉन क्रेडीट कोर्स असून आठवडयातून किमान (०१ ) एक क्लास घेणे आवश्यक आहे. यासाठी जास्तीत जास्त १८ तासिका देण्यात येतील. यासाठी प्रति तास अभ्यागत शिक्षक म्हणून रु. १५००/- प्रति व्याख्यान मानधन देण्यात येईल. हा विषय सन २०२६-२७ आणि २०२७-२८ या शैक्षणिक वर्षासाठी बहिःस्थ शिक्षकांची नेमणूक करण्याकरीता खालील अटी नुसार अर्ज मागविण्यात येत आहे.

१. बौद्धीक तासिका सलग एक तासाची देण्यात येईल.

२. मानधनाव्यतिरिक्त वाहन भत्ता / प्रवासभत्ता अगर अन्य कोणताही भत्ता देण्यात येणार नाही.

३. अभ्यागत शिक्षकाचे काम असमाधानकारक असल्याचे आढळून आल्यास त्याचे आदेश रद्द करण्यात येतील.

४. इच्छूक पात्र उमेदवारांकडे ग्रंथालय व माहिती शास्त्र या विषयातील पदव्युत्तर पदवी, एम.फील किंवा आचार्य पदवी धारण केली असणे आवश्यक आहे.

ईच्छूक उमेदवारांनी आपल्या अर्जासह शैक्षणिक अहर्ता प्राप्त असलेले सर्व दाखल्यांची छायांकित प्रत, आधार कार्ड आणि प्यान कार्ड जोडून बंद लिफाफ्यावर "ग्रंथालय विभाग अभ्यागत शिक्षक नेमणूक करण्याकरिता दरपत्रक" असे नमूद करून " मा. सहयोगी अधिष्ठाता, मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई- १२" यांना दि. २९.०७.२०२६ पर्यत किंवा त्यापूर्वी सादर करावे.

**सहयोगी अधिष्ठाता**

मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परळ,

मुंबई – १२

**प्रत :**

१. सूचना फलक, मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई – १२.

२. डॉ. एस. डी. त्रिपाठी, सहाय्यक प्राध्यापक, पशुवैद्यकीय शल्यचिकित्सा व क्ष-किरणशास्त्र विभाग, मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई – १२.
आपणास आदेशित करण्यात येते की, उपरोक्त जाहिरात मुंबई पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या वेबसाईटवर जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात यावे.